मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपा पंचवार्षिक निवडणुका घ्यायला घाबरते!

## उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हा संघटिका सुलभा उबाळे यांची टिका

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**



ईडी, आयटी, सीबीआय अशा केंद्रीय संस्थांची धमकी देऊन भाजपने राज्यात सत्ता हस्तगत केली आहे. देशात २८ राज्यात भाजप विरोधात सरकार आहेत. जिथे सत्ता मिळत नाही अशा कर्नाटक, गोवा आणि महाराष्ट्र येथे त्यांनी आमदार पळवण्याचे पाप केले आहे. दिल्लीमध्ये देखील मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना त्रास देऊन सत्ता हस्तगत करण्याचे त्यांचे कुटील राजकारण आहे. यांना फक्त निवडणुकीत जुमलेबाजी करून लोकसभा निवडणूक जिंकायची आहे. यांचा कुटील डाव मतदार राजा आता हाणून पाडणार आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड आणि पुणे महानगरपालिकेसह राज्यात अनेक महानगरपालिकेच्या निवडणुका घेण्यास भाजप घाबरत आहे. अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हा संघटिका सुलभा उबाळे यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन मते मिळवणारे राज्यातील भाजपचे नेते दिल्लीत दहा वेळा जाऊन मुजरा करतात आणि महाराष्ट्राला झुकवण्याचे पाप करत आहे. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री शहा यांचे धोरण लोकशाहीला मारक आहे. त्यांनी शिवसेना आणि एनसीपीवर दरोडा घालण्याचे काम केले आहे. शरद पवार यांच्या सारखे ज्येष्ठ नेत्यांचे आणि हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे घर फोडण्याचे पाप भाजपाने केले आहे. आमदार फोडताना वैचारिक पातळी ठेवली नाही. त्यांनी शिवसेनेचे नाव आणि चिन्ह चोरण्याचे पाप केले आहे. त्यांची वृत्ती चांगली नाही. मागील दीड वर्षांपासून राज्यात महापालिकांमध्ये प्रशासकीय राजवट आहे. पिंपरी चिंचवड मधील नागरिक या राजवटीमुळे त्रस्त झाले आहेत. त्यांचा आक्रोश येणाऱ्या निवडणुकीत मतदान पेटीतून व्यक्त होणार आहे, याची जाणीव असल्यामुळेच भारतीय जनता पार्टी निवडणुका घेत नाही, असेही सुलभा उबाळे या म्हणाल्या. पिंपरी चिंचवड शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले यांच्या हस्ते होऊ द्या चर्चा या अभियानाचे उद्घाटन आणि पथनाट्याचे उद्घाटन बुधवारी तळवडे येथे करण्यात आले. यावेळी भोसरी विधानसभा प्रमुख धनंजय आल्हाट, माजी नगरसेविका विजया जाधव, पिंपरी चिंचवड समन्वयक कैलास नेवासकर, उपजिल्हाप्रमुख निलेश मुटके, शहर संघटक संतोष तानाजी वाळके, रावसाहेब थोरात, प्रवीण रजपूत,उपशहर प्रमुख अनिल सोमवंशी, शैलेश मोरे, युवा सेना जिल्हाधिकारी सचिन सानप, समन्वयक आरोग्य सेना सुखदेव नरळे, संघटक दादासाहेब नरळे, संघटिका रूपाली शेटे, आशा भालेकर, नितीन बोंडे, पांडुरंग कदम, नागेश अजून, प्रवीण पाटील, गणेश भिंगारे, अभिजीत जाधव, सतीश कंठाळे, अभिमन्यू सोनसाळे, सर्जेराव कचरे, नंदू चव्हाण, दीपक कदम, मोहन जाधव, भरत पाटील, बाळासाहेब वरे, कैलास तोडकर, राजेंद्र राठोड आदींसह बहुसंख्य युवा, महिला मतदार उपस्थित होते. बुधवारी तळवडे मधील रुपीनगर, चिखली मधील ताम्हणे वस्ती आणि चिखली तळवडे रोड, गुरुवारी अजंठा नगर, महात्मा फुले नगर, घरकुल तर शुक्रवारी चिखली मधील मोरे वस्ती, अष्टविनायक चौक, टाळगाव चिखली चौक येथे रथ फिरवून नागरिकांशी संवाद साधण्यात आला आणि होऊ दे चर्चा हे अभियान राबविण्यात आले. शनिवारी भोसरीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक, जय महाराष्ट्र चौक, दिघी रोड राहुल गवळी संपर्क कार्यालय येथे आणि रविवारी दिघी मधील धर्मवीर संभाजी राजे चौक, आदर्श नगर, संभाजीनगर, चौधरी पार्क, गणेश नगर येथे हे अभियान राबवण्यात येणार आहे. बुधवारी (११ ऑक्टोबर) रोजी अभियानाचा समारोप होणार आहे अशी माहिती सर संघटक संतोष तानाजी वाळके यांनी दिली आहे.

### महापालिकांमध्ये प्रशासकीय राजवट

» शरद पवार यांच्या सारखे ज्येष्ठ नेत्यांचे आणि हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे घर फोडण्याचे पाप भाजपाने केले आहे. आमदार फोडताना वैचारिक पातळी ठेवली नाही. त्यांनी शिवसेनेचे नाव आणि चिन्ह चोरण्याचे पाप केले आहे. त्यांची वृत्ती चांगली नाही. मागील दीड वर्षांपासून राज्यात महापालिकांमध्ये प्रशासकीय राजवट आहे.

# अजितदादांच्या कार्यकर्त्यांचा महापालिकेत वाढला रूबाब!

## शहराध्यक्षांसह पदाधिकारी व माजी नगरसेवकांचा पालिकेकडे ओढा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये सामील होत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारले. तर आता पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपदही मिळालं. त्यामुळे पुन्हा सत्तेत आल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अजित पवार गट महापालिकेत सक्रिय झाला आहे. शहराध्यक्षांसह पदाधिकारी व माजी नगरसेवकांचा महापालिकेत राबता वाढला आहे.

महाविकास आघाडीत अजित पवार मुख्यमंत्री होते. त्या काळात राष्ट्रवादी महापालिकेत ॲक्शन मोडमध्ये होता. मात्र, सत्तांतर होऊन शिंदे यांचे सरकार राज्यात आल्याने राष्ट्रवादीचा उत्साह मावळला होता. पालिकेतील अनेक कामांत गैरव्यवहार झाल्याचा आरोप




करीत राष्ट्रवादीने आंदोलन उभारले होते.

शहराला भेट देत उपमुख्यमंत्री पवार यांनी महापालिकेत २५ ऑगस्टला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत आढावा बैठक घेतली. तसेच, कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. आयुक्त शेखर सिंह यांनाही त्यावेळी अजित पवार यांनी काही कानमंत्र दिले होते. त्यामुळे महापालिकेत पक्षाचे शहराध्यक्ष, पदाधिकारी व माजी नगरसेवकांच्या चकरा वाढल्या आहेत. आपल्या प्रभागातील रखडलेली कामे करून घेण्यात ते आग्रही दिसत आहेत. पालिकेत न फिरकणारेही आता पालिका भवनात अधिकाऱ्यांच्या दालनात दिसत आहेत.

दरम्यान, महापालिकेचे काही अधिकारीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिकेत लक्ष घातल्याने खासगीत समाधान व्यक्त करीत आहेत. पवार यांच्या कामाचे नियोजन व अनुभव पालिकेच्या बऱ्याच अधिकाऱ्यांना आहे. त्यामुळे ते आता रखडलेली कामे व प्रकल्प वेगात मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त करीत आहेत.

# डॉ. अशोक शिलवंत यांच्या स्मृती प्रित्यर्थ सोमवारी पुरस्कार वितरण!

## पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान श्रीपाल सबनीस भूषविणार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी अशोक सर्वांगीण विकास सोसायटी व अशोक नागरी सहकारी बँकेचे संस्थापक स्मृतिशेष डॉ. अशोक शीलवंत यांच्या तृतीय स्मृती दिनाचे औचित्य साधून सोमवारी (दि. ९ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता पिंपरीतील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे विविध पुरस्कार आणि पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पिंपरी चिंचवडच्या माजी नगरसेविका डॉ. सुलक्षणा शीलवंत धर यांनी शुक्रवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आचार्य



रतनलाल सोनग्रा, महेंद्र भारती, अशोक नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष ॲड. राजरत्न शीलवंत आदी उपस्थित होते. डॉ. सुलक्षणा शिलवंत धर यांनी सांगितले की, या पुरस्कार वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस भूषविणार आहेत. खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, उद्योजक सचिन इटकर, ज्येष्ठ साहित्यिक रतनलाल सोनग्रा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच डॉ. अशोक शीलवंत यांच्या नावाने धम्मदीप पुरस्कार दैनिक लोकमतचे पुणे आवृत्ती संपादक संजय आवटे, समाजभूषण पुरस्कार माजी आमदार ॲड.जयदेव गायकवाड आणि बौद्ध समाज विकास महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब डोळस, विद्या भूषण पुरस्कार इंद्रायणी शिक्षण संस्थेचे सचिव चंद्रकांत शेटे, पत्रकार भूषण पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे आणि काव्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ कवयत्री स्वाती सामक यांना प्रदान करण्यात येणार आहेत. लेणी संवर्धन व विहार संवर्धन समिती सन्मान सोहळा व ज्येष्ठ साहित्यिक बाबा भारती यांनी अनुवादित केलेल्या धम्मपद ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचे पुस्तक प्रकाशन श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी डॉ. अशोक शिलवंत यांना अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन ॲड. राजरत्न शिलवंत यांनी केले.

# भोसरी रुग्णालयात सुरु होणार पदव्युत्तर अभ्यासक्रम!

## एमबीबीएस झालेले डॉक्टर पालिकेला उपलब्ध होणार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव, भोसरी रुग्णालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहे. पोस्ट ग्रॅज्युट कोर्सेस सुरु करण्यास डीएनबी बोर्डाने परवानगी दिली. त्यामुळे वैद्यकीय विभागात मानाचा तुरा रोवला गेला असून एमबीबीएस झालेले डॉक्टर महापालिकेला उपलब्ध होणार आहेत. महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत त्यास परवानगी मिळाली आहे. त्यानंतर आता नवीन थेरगाव, नवीन भोसरी रुग्णालयातही पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु होणार आहे. एमबीबीएसनंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम असून दोन वर्षांसाठीचे आहेत. डीएनबी बोर्डाने १४ जागांना मंजुरी दिली आहे. थेरगाव रुग्णालयासाठी १२ जागा असणार आहेत. त्यात स्त्रीरोग, बालरोग, भूलतज्ज्ञ विभागासाठी प्रत्येकी ४ अशा १२ जागा असणार आहेत. तर, भोसरी रुग्णालयातील स्त्रीरोग विभागासाठी २ जागांसाठी मान्यता मिळाली आहे. एमबीबीएस झालेले विद्यार्थी शिकण्यासाठी येणार आहेत. या विद्यार्थ्यांना शिकविण्या



साठी प्राध्यपकांची भरती केली जाणार नाही. महापालिका रुग्णालयातील उपलब्ध डॉक्टरच शिकविणार आहेत. एमबीबीएस झालेले हे डॉक्टर चोवीस तास उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे महापालिकेचे मनुष्यबळ वाढणार असून सेवा पुरविण्यासाठी फायदा होणार आहे. याबाबतची माहिती देताना महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे म्हणाले की, डीएनबी पदव्युत्तर कोर्स सुरु झाल्यामुळे एमबीबीएस शिक्षण झालेले डॉक्टर उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे वैद्यकीय सुविधा नागरिकांना सक्षमपणे देण्यास फायदा होणार आहे. त्यासाठी नवीन प्राध्यापक भरण्याची आवश्यकता नाही. सद्यस्थितीतील डॉक्टरांच्या अधिपत्याखालीच शिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे प्राध्यापकांचा कोणताही खर्च न वाढता हे कोर्स सुरु होणार आहेत. भविष्यात इतर विषयांसाठी सुद्धा अर्ज करणार आहोत. आकुर्डी, जिजामाता रुग्णालयातही असे कोर्सेस सुरु करण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत.

### डीएनबीने दिली १४ जागांना मंजुरी

» एमबीबीएसनंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम असून दोन वर्षांसाठीचे आहेत. डीएनबी बोर्डाने १४ जागांना मंजुरी दिली आहे. थेरगाव रुग्णालयासाठी १२ जागा असणार आहेत. त्यात स्त्रीरोग, बालरोग, भूलतज्ज्ञ विभागासाठी प्रत्येकी ४ अशा १२ जागा असणार आहेत. तर, भोसरी रुग्णालयातील स्त्रीरोग विभागासाठी २ जागांसाठी मान्यता मिळाली आहे. एमबीबीएस झालेले विद्यार्थी शिकण्यासाठी येणार आहेत. या विद्यार्थ्यांना शिकविण्या साठी प्राध्यपकांची भरती केली जाणार नाही. महापालिका रुग्णालयातील उपलब्ध डॉक्टरच शिकविणार आहेत.

# शहरातील रस्ते दुरुस्तीची कामे ठप्प!

## येरवड्यातील 'हॉटमिक्स' प्रकल्प नादुरुस्त

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पावसाने उघडीप दिल्याने रस्ते दुरुस्ती युद्धपातळीवर करण्याच्या महापालिकेच्या मनसुब्यावर येरवड्यातील हॉटमिक्स प्रकल्प पुन्हा नादुरुस्त झाल्याने पाणी फिरले गेले आहे. हॉटमिक्स प्रकल्प नादुरुस्त झाल्याने रस्ते दुरुस्तीची प्रक्रिया ठप्प झाली असून, पुढील काही दिवस वाहनचालक आणि पादचाऱ्यांना खड्ड्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागणार आहे. रस्ते आणि खड्डे दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या डांबरमिश्रीत खडीसाठी (हॉटमिक्स) येरवडा येथे हॉटमिक्स प्रकल्प महापालिकेकडून उभारण्यात आला आहे. शहराचे क्षेत्रफळ २५० चौरस किलोमीटर असताना या प्रकल्पामधून पुरेसे हॉटमिक्स उपलब्ध होत होते. मात्र, गेल्या काही वर्षांत शहराचा विस्तार झपाट्याने झाला



आहे. महापालिका हद्दीत ३४ गावांच्या समावेशामुळे भौगोलिक क्षेत्र ५१९ चौरस किलोमीटर एवढे झाले आहे. त्यामुळे कच्चा माल तयार करण्याचा संपूर्ण भार हा येरवडा येथील हॉटमिक्स प्रकल्पावर आहे. त्यामुळे रस्ते दुरुस्तीची वेळ आल्यानंतर ऐन मोक्याच्या क्षणी प्रकल्प बंद पडत आहे. ऑगस्ट महिन्यात हा प्रकल्प तीन वेळा बंद पडला होता. त्यानंतर प्रकल्पाचे कंट्रोल पॅनेल नादुरुस्त झाल्याने डांबरमिश्रीत खडी उपलब्ध होण्यास मर्यादा आल्या आहेत. रस्त्यांवरील खड्डे सात दिवसांच्या आता बुजवावेत, असे आदेश महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी गणेशोत्सवानंतर दिले होते. ही मुदत शनिवारी (७ ऑक्टोबर) संपणार आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून पथ विभागाबरोबरच क्षेत्रीय कार्यालयांकडून खड्डे बुजविण्याला प्रारंभ करण्यात आला आहे. त्यासाठी डांबरमिश्रीत खडीची मागणी करण्यात आली आहे. मात्र, प्रकल्प बंद असल्याने ती पूर्ण झालेली नाही. सध्या ७० ते ७५ टन एवढी डांबरमिश्रीत खडी या प्रकल्पातून उपलब्ध होत आहे. या प्रकल्पामधून प्रतिदिन सरासरी ५०० टन डांबरमिश्रीत खडी तयार केली जाते. महापालिकेचा पथ विभाग आणि १५ क्षेत्रीय कार्यालयाला प्रत्येकी १० टन या प्रमाणे १५० टन डांबरमिश्रीत खडी दिली जाते. पावसाने उघडीप दिली असल्याने खड्डे दुरुस्तीला गती येईल, असे वाटत असतानाच खड्डे दुरुस्तीची प्रक्रिया मात्र ठप्प झाली आहे.

### चारही बाजूला हॉटमिक्स प्रकल्प?

**» महापालिका हद्दीत ३४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शहराची भौगोलिक हद्दही वाढली आहे. समाविष्ट गावातील रस्त्यांची दुरुस्तीही महापालिकेला करावी लागत आहे. येरवडा येथील प्रकल्पावर ताण येत असल्याने काही वर्षांपूर्वी शहराच्या चारही बाजूला हॉटमिक्स प्रकल्प उभारण्याचे नियोजित होते. स्थायी समितीच्या बैठकीत तसा निर्णयही झाला होता. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. रस्ते आणि खड्डे दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या डांबरमिश्रीत खडीसाठी (हॉटमिक्स) येरवडा येथे हॉटमिक्स प्रकल्प महापालिकेकडून उभारण्यात आला आहे. शहराचे क्षेत्रफळ २५० चौरस किलोमीटर असताना या प्रकल्पामधून पुरेसे हॉटमिक्स उपलब्ध होत होते. मात्र, गेल्या काही वर्षांत शहराचा विस्तार झपाट्याने झाला आहे. महापालिका हद्दीत ३४ गावांच्या समावेशामुळे भौगोलिक क्षेत्र ५१९ चौरस किलोमीटर एवढे झाले आहे. त्यामुळे कच्चा माल तयार करण्याचा संपूर्ण भार हा येरवडा येथील हॉटमिक्स प्रकल्पावर आहे.**

# पुणे मेट्रो वारंवार का बंद पडतेय?

## मेट्रो मार्गात तांत्रिक बिघाडाचा खोडा सुरू

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुणे मेट्रो मार्गात सध्या तांत्रिक बिघाडाचा खोडा सुरू आहे. मागील सलग दोन दिवसांत मेट्रो सेवा काही काळ बंद पडली होती. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले. वारंवार घडणाऱ्या या घटनांची चौकशी महामेट्रोने सुरू केली असून, भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. रुबी हॉल ते वनाझ मार्गावरील मेट्रो सेवा मंगळवारी (ता. ३) अचानक अर्धा तास खंडित झाली होती. या मार्गावरील मेट्रो २१ मिनिटे नळस्टॉप स्थानकावर थांबून होती. मेट्रोच्या ओव्हरहेड केबलला पक्षी धडकल्याने वीजपुरवठा खंडित होऊन सेवा बंद झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी बुधवारी (ता. ४) मेट्रोच्या गाडीत तांत्रिक



### अतिशय संथ गतीने आली पुणे मेट्रो

**» मेट्रोच्या ओव्हरहेड केबलला पक्षी धडकल्याने वीजपुरवठा खंडित होऊन सेवा बंद झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी बुधवारी (ता. ४) मेट्रोच्या गाडीत तांत्रिक बिघाड झाला. गाडी काही मिनिटे विलंबाने आली; परंतु, ती अतिशय संथ गतीने आली. प्रवाशांनी आतमध्ये जाण्यासाठी दरवाजासमोर गर्दी केली. परंतु, ते उघडले नाहीत. अखेर काही वेळाने दरवाजे न उघडता मेट्रो पुढे गेली.**

बिघाड झाला. गाडी काही मिनिटे विलंबाने आली; परंतु, ती अतिशय संथ गतीने आली. प्रवाशांनी आतमध्ये जाण्यासाठी दरवाजासमोर गर्दी केली. परंतु, ते उघडले नाहीत. अखेर काही वेळाने दरवाजे न उघडता मेट्रो पुढे गेली. त्यानंतर काही मिनिटांनी आलेल्या दुसऱ्या मेट्रोने प्रवाशांना प्रवास करावा लागला. मेट्रोची विस्तारित सेवा सुरू झाल्यापासून वारंवार तांत्रिक बिघाड होत आहेत. त्यामुळे आता मेट्रोने बुधवारी झालेल्या प्रकाराची चौकशी सुरू केली आहे. महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे म्हणाले, की मेट्रो गाडीच्या दरवाजाच्या सेन्सरमध्ये समस्या निर्माण झाल्याने बुधवारी तांत्रिक अडचण निर्माण झाली. मेट्रोत एखादा तांत्रिक बिघाड झाल्यास प्रत्येक विभागाची शीघ्र प्रतिसाद पथके आहेत. जिथे बिघाड झाला असेल, तिथे ती तातडीने पोहोचून दुरुस्ती करतात. तांत्रिक बिघाड झाल्यास त्याच्या कारणांची चौकशी केली जाते. याचबरोबर संबंधितांना याबाबत विचारणाही केली जाते. आगामी काळात अशा घटना घडू नयेत, यासाठी पावले उचलली जात आहेत. त्यात होणारे बिघाड तातडीने दुरुस्त केले जात आहे. ओव्हरहेड वायरला पक्षी धडकणे आपण टाळू शकत नाही. त्यामुळे विद्युतपुरवठा खंडित होतो.

# विद्यापीठात ७५ आयुर्वेदिक वनस्पतींचे अमृत उद्यान!

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठात अमृत उद्यानाची निर्मिती करण्यात येणार आहे. हत्तीखान्याच्या सरोवराजवळ साकारत असलेल्या या उद्यानात ७५ आयुर्वेदिक वनस्पतीची लागवड करण्यात येणार आहे. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी वृक्षारोपण करून अमृत उद्यान निर्मिती उपक्रमाचा प्रारंभ केला.
प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे, वित्त व लेखा अधिकारी चारुशीला गायके, विद्यापीठ सल्लागार समितीचे सदस्य राजेश पांडे या वेळी उपस्थित होती. विद्यापीठाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने उद्यान निर्मितीचा प्रस्ताव मांडला होता. कुलगुरूंनी या प्रस्तावाला मान्यता दिली. त्यानुसार आता या उद्यानाची निर्मिती करण्यासाठी ७५ आयुर्वेदिक वनस्पतींचे रोपण करण्यात आले. डॉ. गोसावी म्हणाले, की आयुर्वेदिक वनस्पती उद्यान हे अनोखे ठरणार आहे. वनस्पतीशास्त्र किंवा विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वनस्पतींची गरज असते. त्यामुळे स्वत:चे उद्यान असावे ही कल्पना होती. त्यामुळे हा परिसर चांगल्या पद्धतीने विकसित होईल. उद्यानातील वनस्पती उद्यानामध्ये ७५ आयुर्वेदिक आणि देशी वनस्पतींचा समावेश आहे.

# पुण्यात होणार २९ आरोग्यवर्धिनी केंद्र!

## केंद्र सरकारकडून ६ कोटींचा निधी प्राप्त

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरात २९ ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्यासाठी केंद्र सरकारकडून ६ कोटी ६४ लाखांचा निधी महापालिकेला प्राप्त झाला आहे. महापालिकेला निधी मिळाल्याने आरोग्यवर्धिनी केंद्र स्थापन करण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार असून येत्या महिन्याभरात या केंद्रांची उभारणी करण्याचे नियोजन महापालिकेच्या आरोग्य विभागाने केले आहे. शहरातील आरोग्य सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी आणि आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्याचे नियोजित आहे. शहराच्या विविध भागांबरोबरच समाविष्ट गावातही आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्यात येणार आहेत. एकूण १३० आरोग्य केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे.

या आरोग्यवर्धिनी केंद्रात एक डॉक्टर, दोन परिचारिका, ड्रेसर आणि फार्मासिस्ट असे चारजणांचे पथक कार्यरत राहणार आहे. आरोग्यवर्धिनी उभारण्यासाठी केंद्र सरकारकडून आर्थिक निधी मिळणार आहे. त्यासाठी खासगी कर्मचारी वर्गही



नियुक्त करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात २९ केंद्र सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. हिंगणे, वारजे-कर्वेनगर, शिवणे, हडपसर-मुंढवा, वानवडी, कोथरूड, बावधन, कोंढवा, धावडे, धनकवडी या भागात केंद्र उभारण्यात येणार असून त्यासाठी जागा निश्चितही करण्यात आली आहे. दरम्यान, आरोग्यवर्धिनी केंद्रांबरोबरच दहा रुग्णालयांत पॉलिक्लिनिक उभारण्यात येणार आहे. त्यामध्ये सर्व आजारांवरील तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येणार असून यामध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ अशी सुविधा असणार आहे. आरोग्यवर्धिनी केंद्र आणि पॉलिक्लिनिकमुळे आरोग्य सेवेचे बळकटीकरण होईल, असा दावा महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात आला आहे.

### आरोग्यवर्धिनी केंद्रात एक डॉक्टर

» शहराच्या विविध भागांबरोबरच समाविष्ट गावातही आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्यात येणार आहेत. एकूण १३० आरोग्य केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे. या आरोग्यवर्धिनी केंद्रात एक डॉक्टर, दोन परिचारिका, ड्रेसर आणि फार्मासिस्ट असे चारजणांचे पथक कार्यरत राहणार आहे. आरोग्यवर्धिनी उभारण्यासाठी केंद्र सरकारकडून आर्थिक निधी मिळणार आहे. त्यासाठी खासगी कर्मचारी वर्गही नियुक्त करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात २९ केंद्र सुरु करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

# देणगीदार अन् गरजवंतात मोठी दरी!

## सामाजिक कामास तंत्रज्ञानाची जोड मिळणे आवश्यक

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** देणगीदार आणि गरजवंत यांच्यातील दरी आजही कायम आहे. समाजभान बाळगून मदत करणार्‍यांची संख्या मोठी आहे, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही दरी मिटवत सामाजिक काम झाल्यास सामाजिक क्षेत्रात चमत्कार वाटावा असे मोठे काम उभे राहू शकते, असा विश्वास ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी शुक्रवारी येथे बोलताना व्यक्त केला.

आर्टिस्ट्री या संस्थेतर्फे वेगवेगळ्या क्षेत्रातील सामाजिक संस्थांच्या कार्याचे प्रदर्शन करणाऱ्या 'देणे समाजाचे' या सामाजिक उपक्रमाचे उद्घाटन डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. कर्वे रोड येथील हर्षल हॉलमध्ये आयोजित 'देणे समाजाचे' या सामाजिक उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर 'गप्पाष्टककार' डॉ. संजय




उपाध्ये आणि आर्टिस्ट्री संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष वीणा गोखले उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले की, कॉर्पोरेट सोशल रिसपॉन्सबिलीटी अंतर्गत करण्यात येणाऱ्या मदतीला फार मोठ्या स्तरावर बजेट असते. समाजातील दुर्बल आणि दुर्गम भागात राहणाऱ्या गरजवंतांच्या सर्वांगिण उत्थानासाठी उच्च तंत्रज्ञानावर आधारीत नवनवीन संशोधन विकसित होणे आवश्यक आहे. सामाजिक कार्यास तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास हे उद्दीष्ट साध्य होईल. पुणे इंटरनॅशनल सेंन्टरच्या माध्यमातून विविध कंपन्यांचे सीएसआर प्रमुख आणि समाजातील गरजवंत संस्था यांच्यात दुवा साधण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्या अंतर्गत नॅशनल कॉन्फरन्स ऑन सोशल इनोव्हेशन देखील आयोजित करण्यात आली आहे. देशातील पहिली सोशल इनोव्हेशन लॅबोरेटरी सुरू करण्यात आली आहे, असे ते म्हणाले. डॉ. संजय उपाध्ये म्हणाले की, समाजामध्ये अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या संस्थांना समाजाने वेगवेगळ्या प्रकारचे दान देण्याची गरज आहे. हे दान आर्थिक स्वरूपाचेच असले पाहिजे असे नाही. आपण शक्य त्या स्वरूपात मदत करणे गरजेचे आहे. सीएसआरप्रमाणे प्रत्येकाने वैयक्तिक सामाजिक जबाबदारी पार पाडली पाहिजे.

# मिळकतधारकांची एक कोटीची बक्षीसे ?

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मिळकतकर भरण्यास मिळकतधारकांना प्रोत्साहित करण्यासाठी महापालिकेने एक कोटी रुपयांची विविध बक्षीसे देण्याचे जाहीर केले होते. मात्र, ही एक कोटी रुपयांची बक्षिसे कागदावरच राहिली आहेत. बक्षिसापोटीच्या वस्तूंची खरेदी न झाल्याने बक्षिसांचे वितरण करण्यात आलेले नाही.

दरम्यान, दसऱ्यापर्यंत वस्तूंचे वितरण करण्याचे नियोजन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षातील मिळकतकर भरण्यासाठी महापालिकेने मिळकतकर लॉटरी योजना जाहीर केली होती. त्यामध्ये पेट्रोल कार, ई-बाईक, मोबाईल संच आणि लॅपटॉप अशा वस्तूंचा समावेश होता. तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सोडत काढण्यात आली होती. वार्षिक कर २५ हजार रुपयांपेक्षा कमी कर असलेल्या दोघांना प्रत्येकी एक-एक तर २५ हजारांपेक्षा जास्त पण ५० हजारांपेक्षा कमी असणाऱ्या एका मिळकतधारकाला एक पेट्रोल कार जाहीर करण्यात आली होती. याच प्रकारातील सहा मिळकतधारकांना सहा ई-बाईक तर २५ ते ५० हजार रुपयांपर्यंत कर भरणाऱ्या तिघांना अशा एकूण नऊ ई-बाईक देण्यात आल्या. तसेच २५ हजारांपर्यंत कर भरणाऱ्या सहा मिळकतधारकांना सहा मोबाईल संच तर २५ ते ५० हजारांपर्यंत कर भरणाऱ्या तीन मिळकतधारकांना मोबाईल संच देण्यात आला. लॉटरीनंतरही बक्षिसे देण्यात न आल्याने महापालिकेवर टीका करण्यात आली होती. मात्र, बक्षिसांच्या गाड्या आणि अन्य वस्तूंची खरेदी झाली नसल्याने गणेशोत्सवात बक्षिसे दिली जातील, असे महापालिकेकडून जाहीर करण्यात आले होते. मात्र, गणेशोत्सवानंतरही विजेत्यांना बक्षिसाच्या रकमेची प्रतीक्षा आहे.